# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग

### पत्रकारिता प्रगत अभ्यासक्रम २०२४

(Advanced Course in Journalism)
दोन सत्रांचा श्रेयांकाधारित अभ्यासक्रम

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचे नाव, रचना व श्रेयांकांमध्ये सुधारणा करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे पूर्वीच्या पदव्युतर पदविका अभ्यासक्रमाचे रुपांतर पुढीलप्रमाणे पत्रकारिता प्रगत अभ्यासक्रमात करण्यात येत आहे.

(**टिपणी**: विद्यापीठातील विभागात त्याचे अंतर्गत व बाह्य मूल्यांकन ५०-५० टक्के असे राहील. तर संलग्न महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांनुसार त्याचे अंतर्गत व बाह्य मूल्यांकनाचे स्वरूप राहील.)

| **सत्र पहिले** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **विषय क्र.** | **विषयाचे शीर्षक** | **श्रेयांक** | **गुण** | | |
| | | | **अंतर्गत मूल्यमापन** | **सत्रान्त परीक्षा** | **एकूण** |
| ACJ 101 | भारतीय पत्रकारिताः उगम, विकास व नवे प्रवाह | 04 | 50 | 50 | 100 |
| ACJ 102 | मुद्रित पत्रकारिता – मूलतत्त्वे, प्रक्रिया व कौशल्ये | 04 | 50 | 50 | 100 |
| ACJ 103 | माध्यम तंत्रज्ञान | 04 | 50 | 50 | 100 |
| ACJ 104 | संज्ञापन कौशल्ये | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 105 | दूरचित्रवाणी व दृकश्राव्य पत्रकारिता | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 106 | नभोवाणी व श्राव्य पत्रकारिता | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 107 | डिजिटल पत्रकारिता | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 108 | चालू घडामोडी (राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्य) | 02 | 25 | 25 | 50 |
| | **एकूण** | **22** | **275** | **275** | **550** |
| | | | | | |
| **सत्र दुसरे** | | | | | |
| **विषय क्र.** | **विषयाचे शीर्षक** | **श्रेयांक** | **गुण** | | |
| ACJ 201 | वार्तांकनाची क्षेत्रे | 04 | 50 | 50 | 100 |
| ACJ 202 | जाहिरात | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 203 | जनसंपर्क व कॉर्पोरेट संवाद | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 204 | माध्यमे आणि समाज | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 205 | माध्यम व्यवस्थापन व कायदे | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 206 | चालू घडामोडी (राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्य) | 02 | 25 | 25 | 50 |
| ACJ 207 | कार्यानुभव | 04 | 50 | 50 | 100 |
| ACJ 208 | व्यक्तिगत प्रकल्प | 04 | 50 | 50 | 100 |
| | **एकूण** | **22** | **275** | **275** | **550** |

## ACJ 101 **भारतीय पत्रकारिताः उगम, विकास व नवे प्रवाह**

**उद्देशः** भारतातील माध्यमे आणि पत्रकारितेचा इतिहास या अध्ययनातून विद्यार्थ्यांना माहिती होईल. या माध्यमांचा विकास कसा होत गेला, याबरोबरच भारतातील विविध माध्यमांमधील पत्रकारितेचे सध्याचे स्वरूप व त्यापुढील आव्हानांची जाणीव त्यांना होऊ शकेल. तसेच, नजीकच्या भविष्यात माध्यमे व पत्रकारितेतील कोणते प्रवाह बळकट होतील, यासंबंधीचे काही दिशादर्शनही त्यांना मिळू शकेल.

1. **भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा प्रारंभ व स्वातंत्र्यपूर्व पत्रकारिताः** मुद्रणक्रांती व आधुनिक पत्रकारितेचा प्रारंभ, भारतातील मुद्रणतंत्रज्ञानाचा विकास, जेम्स हिकी व अँग्लो-इंडियन पत्रकारिता, राममोहन रॉय आणि भाषिक पत्रकारितेचा प्रसार, स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदी आणि इतर भारतीय भाषांमधील महत्त्वाची वृत्तपत्रे व त्यांचे संपादक
2. **स्वातंत्र्यपूर्व मराठी पत्रकारितेतील महत्त्वाचे टप्पेः** मराठी वृत्तपत्रसृष्टीचा प्रारंभ, दर्पण व बाळशास्त्री जांभेकर, प्रभाकर व शतपत्रे, केसरी आणि राष्ट्रीय पत्रकारिता, ज्ञानप्रकाश, सुधारक व इतर मराठी वृत्तपत्रे, डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता, मराठी वृत्तपत्रांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग, सकाळ व बातमीप्रधान वृत्तपत्रे, जिल्हा वृत्तपत्रे
3. **स्वातंत्र्योत्तर मराठी पत्रकारितेतील महत्त्वाचे टप्पेः** स्वातंत्र्योत्तर पत्रकारितेचे स्वरूप व वैशिष्ट्ये, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील वृत्तपत्रांचा सहभाग, प्रमुख मराठी दैनिके, त्यांचा इतिहास व सद्यस्थिती, आणीबाणी व वृत्तपत्रांवरील निर्बंध, जागतिकीकरण व मराठी वृत्तपत्रे, तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रांवर झालेला परिणाम
4. **भारतातील नभोवाणी, दूरचित्रवाणी व डिजिटल माध्यमांचा विकासः** भारतातील नभोवाणी व दूरचित्रवाणीचा इतिहास, प्रसारभारती, एफएम रेडिओ, पॉडकास्ट व डिजिटल रेडिओ, खासगी दूरचित्रवाणी वाहिन्या आणि वृत्तवाहिन्या, इंटरनेट व डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रसार, भारतातील डिजिटल माध्यमांचा इतिहास व प्रमुख टप्पे
5. **भारतीय माध्यमांची सद्यस्थिती व त्यांच्यापुढील आव्हानेः** भारत व महाराष्ट्रातील प्रमुख माध्यमसंस्था, माध्यम क्षेत्राचे बदलते स्वरूप व नवोदित संस्था, बहुमाध्यम संस्थांचा उदय व त्यांच्यापुढील आव्हाने
6. **माध्यमांचे बदलते तंत्रज्ञान व नवे प्रवाहः** तंत्रज्ञान विकासाचा प्रस्थापित माध्यमांवरील परिणाम, डिजिटल माध्यमांचा वाढता अवकाश व नवे प्रयोग, मशिन लर्निंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम प्रज्ञा) यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा माध्यमक्षेत्रावरील संभाव्य परिणाम, माध्यमांमधील नवे प्रयोग आणि उभरते प्रवाह

## ACJ **102** **मुद्रित पत्रकारिताः मूलतत्त्वे, प्रक्रिया व कौशल्ये**

**उद्देशः** पत्रकारितेत विविध प्रकारची माहिती संकलित करून ती बातम्यांच्या स्वरुपात लिहिणे, हे महत्त्वाचे व मूलभूत कौशल्य आहे. माध्यमांचे स्वरूप कोणतेही असले, तरी कोणत्याही आशयनिर्मितीचा बातमी हा मुख्य आधार असतो. तसेच, बातम्या व लेखांच्या स्वरुपातील माहिती उत्तमरीत्या संपादित करणे अत्यावश्यक ठरते. हे लक्षात घेऊन मुद्रित पत्रकारितेतील मूलभूत तत्त्वे आणि प्रक्रियांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी. तसेच, त्यातील वार्तांकन व वृत्तसंपादनाची कौशल्ये त्यांना संपादित करता यावीत, हा या विषयाचा मुख्य उद्देश आहे.

1. **वृत्तपत्र संस्था व संपादकीय विभागाची रचनाः** वृत्तपत्रांचे स्वरूप, वृत्तपत्र संस्थेतील विविध विभाग – संपादकीय, जाहिरात, निर्मिती, मुद्रण, वितरण, व्यवस्थापन, आदी; संपादकीय विभागाची रचना – वृत्तदालनाचे महत्त्व, विविध पदांचे कार्ये व भूमिका, वृत्तदालनांचे बदलते स्वरूप

2. **वृत्तसंकलनाचे महत्त्व:** बातमीच्या व्याख्या व स्वरूप, बातमीमूल्ये व त्यांची उदाहरणे, बातमीदाराचे कार्य व जबाबदारी, मुख्य बातमीदाराचे कार्य व जबाबदारी, बातम्यांचे स्रोत, वृत्तसंकलनाची साधने व त्यांचे महत्त्व, सहा 'क'कार (कोणी, केव्हा, कोठे, काय, कसे आणि का), सातवा 'क'– पुढे काय?माहिती संकलनाच्या पद्धती, बातमीसाठी मुलाखत, बातमीदाराची वही, वृत्तसंकलनाचे नवे स्रोत व साधने, नवी बातमीमूल्ये, माहिती अधिकाराचा वापर

3. **बातमीलेखनाच्या पद्धती व बातम्यांचे प्रकार:** बातमीदाराची गुणसंपदा व कौशल्ये, बातमीलेखनाची उलटा त्रिकोण पद्धती, शिरोभागांचे महत्त्व व विविध प्रकार, बातम्यांचे विविध प्रकार (अन्वयार्थ, विश्लेषण, विकासप्रवण, शोध घेणारी, लोकरूची), बातमीलेखनाच्या इतर पद्धती – कथनात्मक, वर्णनात्मक, अरेषीय, इत्यादी; बातमीची भाषा – सुलभता, छोटी वाक्ये, परिचित शब्द

4. **संपादनाची आवश्यकता व स्वरूप:** संपादनाचे स्वरूप व आवश्यकता, उपसंपादकाचे कार्य व जबाबदारी, उपसंपादकाची गुणसंपदा, वृत्तदालनातील विविध विभाग (डेस्क), वृत्तसंपादक व मुख्य उपसंपादकाच्या भूमिका व जबाबदाऱ्या, बातमीचे संपादन – भाषिक चुकांची दुरुस्ती (प्रमाणलेखनाचे नियम, वाक्यरचना व परिच्छेदरचना, पुनरुक्ती टाळणे, संक्षेप), मुद्रितशोधनाचे तंत्र व मंत्र, बातमीतील तथ्ये व संदर्भांची तपासणी, बातमीचे फेरलेखन – का, केव्हा व कसे?, शिरोभागाची तपासणी, बातमीचे मथळे व उपशीर्षके, मथळ्यांचे प्रकार, शैलीपुस्तिका, विविध प्रकारच्या मजकुराचे संपादन, आशयाचे मूल्यवर्धन

5. **बातम्या व लेखांचे भाषांतर:** वृत्तसंस्थांचे स्वरूप व कार्य, बातम्यांचे डिजिटल स्रोत, बातम्यांची निवड, स्थान आणि आकारनिश्चिती, भाषांतराची आवश्यकता व महत्त्व, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधील भेद, भाषिकदृष्ट्या सामाजिक व सांस्कृतिक संदर्भांचे वेगळेपण, अचूक शब्दनिवड व सुयोग्य वाक्यरचना, पारिभाषिक शब्द व क्लिष्टता टाळून सोपेपणा व अर्थवाहीपणाचा आग्रह, संकलन आणि सारांश, लेखांचे भाषांतर – लेखकाची शैली व आशयाचे वेगळेपण, विषयांचे वैविध्य आणि अर्थाची अचूकता, विविध शब्दकोश आणि ज्ञानकोशांचा वापर, गुगल तंत्राधारित भाषांतरातील धोके व गफलती

**6.** **वृत्तलेखांचे प्रकार व लेखनपद्धती:** वृत्तपत्रीय लेखनाचे स्वरूप, वृत्तलेख म्हणजे काय?, बातम्या आणि वृत्तलेख यातील साम्यभेद, वृत्तलेखांसाठी विषयांचा शोध व निवड, वृत्तलेखांचे विविध प्रकार, वृत्तलेखांसाठी संशोधन व माहितीसंकलन, वृत्तलेख लेखनाचे तंत्र व मंत्र, वृत्तलेखांचे संपादन व मांडणी

**7.** **अग्रलेख:** वृत्तपत्रांतील अग्रलेखाचे स्थान, अग्रलेखांचे स्वरूप व प्रकार, अग्रलेखासाठी विषयांची निवड, अग्रलेखांचे उद्दिष्ट व लेखनपद्धती, काही गाजलेल्या आणि समकालीन अग्रलेखांचा अभ्यास

**8.** **छायाचित्र पत्रकारिता:** वृत्तपत्रे व मुद्रित माध्यमांमध्ये छायाचित्रांचे महत्त्व, वृत्तछायाचित्रे आणि छायाचित्रांमधील बातमी, छायाचित्रांची निवड व संपादन, छायाचित्रांखालील ओळींचे लेखन, छायाचित्रकथा व सादरीकरणाचे इतर प्रकार

9. **वृत्तपत्रांची मांडणी:** कलात्मक मांडणीचे घटक व मूलतत्त्वे, वृत्तपत्रे व नियतकालिकांच्या मांडणीचे घटक (टंकांची निवड व आकार, रंगसंगती, मोकळी जागा, इत्यादी), मास्टहेड ते प्रेसलाइन – बातम्यांची रचना, पृष्ठरचना, पहिल्या व आतील पानांची मांडणी, उभी व आडवी मांडणी, स्थितिशील व गतिशील मांडणी, छायाचित्रे व इतर दृश्य घटकांचा वापर, इन्फोग्राफिक्स, रेखाचित्रे आणि व्यंगचित्रे, वृत्तपत्रमांडणीसाठीची सॉफ्टवेअर व बदलते तंत्रज्ञान

ACJ **103** **माध्यम तंत्रज्ञान** (एकूण श्रेयांक – ४)

**उद्देश:** माध्यमे आणिपत्रकारितेचे क्षेत्र वेगाने बदलत असून, त्यात बदलत्या तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. वृत्तपत्रनिर्मितीबरोबरच इतर माध्यमांमधील आशय निर्मिती व सादरीकरणाची तंत्रे विद्यार्थ्यांना माहिती असणे व त्यांत काही कौशल्ये संपादित करणे आता गरजेचे बनले आहे. या विषयाद्वारे विद्यार्थ्यांना विविध माध्यमांशी संबंधित तंत्रज्ञानांच्या माहितीबरोबरच काही मूलभूत कौशल्ये शिकता येतील.

1. **वृत्तपत्रनिर्मितीशी संबंधित तंत्रज्ञान व कौशल्ये**: संगणकावर मराठी टंकलेखन– प्रशिक्षण व सराव, वृत्तपत्रांची पृष्ठरचना व मांडणीसाठीचे (डेस्क टॉप पब्लिशिंग – डीटीपी) सॉफ्टवेअर (इनडिझाईन) – प्रशिक्षण व सराव, मुद्रण तंत्रज्ञानाची तोंडओळख, छपाईसाठीचा कागद, मुद्रण बाजारपेठ व संबंधित माहिती

2. **छायाचित्रण व फोटोशॉप**: छायाचित्रणाचे तंत्र व मंत्र, कॅमेरा व इतर तांत्रिक बाबींची माहिती, स्मार्टफोनच्या साह्याने छायाचित्रणाच्या तांत्रिक बाबी, फोटोशॉपच्या साह्याने छायाचित्रांचे संपादन, कोरल ड्रॉ व इतर डिझाइन सॉफ्टवेअर

3. **ध्वनिमुद्रण व संपादन**: ध्वनिमुद्रण व नभोवाणीचा स्टुडिओ, उत्तम ध्वनिमुद्रणासाठी आवश्यक साधने व तंत्र, बाह्य वातावरणात ध्वनिमुद्रणातील अडथळे व उपाय, ध्वनिसंपादनाचे महत्त्व व मूलभूत सॉफ्टवेअर, ऑडॅसिटी व इतर प्रणालींची माहिती, ध्वनिमुद्रणाची मानके, लाइव्ह व मुद्रित कार्यक्रमांची वैशिष्ट्ये व फरक

4. **दृक्-श्राव्य (व्हीडिओ) तंत्रज्ञान व कौशल्ये**: व्हीडिओ कॅमेऱ्याचे प्रकार व तांत्रिक बाबींची माहिती, व्हिडिओ कॅमेऱ्याचे प्रात्यक्षिक, रचना आणि कार्ये, व्हीडिओचित्रणाच्या मूलभूत बाबी, ट्रायपॉड व गिम्बलचा वापर, टेलिप्रॉम्प्टरचा वापर, मूलभूत कॅमेरा शॉट्स व रचना (कॉम्पोझिशन), व्हीडिओ फाईल्सचे प्रकार, मल्टी कॅमेरा शूटिंग; रंगीत एनटीएससी, पीएएल, एसईसीएम, इत्यादी. व्हीडिओ एडिटिंग सॉफ्टवेअरची ओळख (फायनल-कट-प्रो, अ‍ॅडोब प्रीमियर, इत्यादी), मोबाईल व्हिडिओ चित्रण व संपादन, इनपुट-प्रोसेस-आउटपुट-शेयर, अ‍ॅस्पेक्ट रेशो, पिक्सल, फाइल कम्प्रेशन

5. **डिजिटल माध्यमांसाठीचे तंत्रज्ञान व कौशल्ये**: डिजिटल साधनांची ओळख (हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर), डिजिटल माहितीचे स्वरूप व वैशिष्ट्ये (डेटा, मल्टिमीडिया), संकेतस्थळांची निर्मिती, रचना व व्यवस्थापन, वेब सर्व्हर, वेब ब्राउझर, यूआरएल, होम पेज, सर्च इंजिन, इंटरनेट हार्डवेअर, इंटरनेट प्रोटोकॉल, क्लाउड स्टोरेज, सर्च रिसोर्सेस, वेब पेज डेव्हलपमेंट, इन्सर्टिंग, लिंकिंग, ब्लॉगची निर्मिती व संचालन, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन, डेटा पुनर्प्राप्ती आणि विश्लेषण, कंटेन्ट मॅनेजमेंट सिस्टीम (आशय व्यवस्थापन यंत्रणा), विविध समाजमाध्यमांची वैशिष्ट्ये व त्यांच्या प्रभावी वापराची तंत्रे (फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, लिंक्डइन, युट्यूब, आदी), डिजिटल अनालिटिक्स, मेट्रिक्स आणि अल्गोरिदम

ACJ **104** **संज्ञापन कौशल्ये**

**उद्देश:** माध्यमांसह कोणत्याही क्षेत्रांत यशस्वी होण्यासाठी व्यक्तिगत व समूह पातळीवर प्रभावीरीत्या संज्ञापन करणे अत्यावश्यक ठरते. भाषेवरील प्रभुत्व हा तर सर्वच माध्यमांमधील अभिव्यक्तीचा आधार आहे. त्याचबरोबर इतरांशी व्यक्तिगत व गटाच्या पातळीवर प्रभावी संवाद साधणे महत्त्वाची ठरते. माध्यमांमधील करिअरच्या दृष्टीने आवश्यक कौशल्ये विद्यार्थी या विषयाद्वारे आत्मसात करू शकतील.

1. **मराठी भाषेचे स्वरूप व प्रमाणलेखन**:मराठी भाषेच्या विकासाचे टप्पे, मराठी व्याकरण व प्रमाणलेखनाचे नियम, शब्दसंग्रह, म्हणी आणि वाक्प्रचारांचा उपयोग, शब्दकोश व ज्ञानकोशांचा उपयोग, विविध प्रकारचे लेखन व त्यांचा सराव

2. **आंतरव्यक्ती संवाद व गटसंवादाची कौशल्ये:** स्वची ओळख, इतर व्यक्तींशी संवादाची तत्त्वे आणि कौशल्ये, संवादाच्या दृष्टिकोनातून गटबांधणी आणि संवादाची कौशल्ये, संस्था-संघटनांतर्गत संवाद

3. **वक्तृत्व व सादरीकरणाची कौशल्ये:** सार्वजनिक भाषणांची पूर्वतयारी व आवश्यक कौशल्ये, मुलाखती व सूत्रसंचालनाचे तंत्र आणि मंत्र, पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन व इतर साधनांच्या मदतीने सादरीकरण, उपलब्ध वेळेनुसार सादरीकरणाचे प्रशिक्षण (उदा. एलिव्हेटर स्पीच)

4. **इंग्रजी लेखन व संवादाची प्राथमिक कौशल्ये:** इंग्रजी भाषेचे स्वरूप, इंग्रजी व्याकरण व लेखनाचे मूलभूत नियम, इंग्रजी संभाषण – प्रशिक्षण व सराव

(हा विषय मुख्यतः भाषेचे आकलन आणि विद्यार्थ्यांनी संवादकौशल्ये आत्मसात करण्याच्या दृष्टीने प्रात्यक्षिके व सरावावर भर देणारा असेल.)

## ACJ 105 दूरचित्रवाणी व दृक्-श्राव्य पत्रकारिता

**उद्देश:** मुद्रित माध्यमांबरोबरच दृक्-श्राव्य माध्यमांचे क्षितिज वेगाने विस्तारत आहे. दूरचित्रवाणीवरील मनोरंजनपर कार्यक्रमांबरोबरच वृत्तवाहिन्या आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरील दृक्-श्राव्य आशयाचे वाढते प्रमाण आदींमध्ये आशयनिर्मितीची मोठी संधी आहे. त्यांची ओळख व काही तंत्राधारित कौशल्ये विद्यार्थी या विषयातून आत्मसात करू शकतील.

**1. दृक्-श्राव्य माध्यमांचे स्वरूप:** दृक्-श्राव्य माध्यमांचा संक्षिप्त इतिहास, स्वरूप आणि वैशिष्ट्ये, प्रक्षेपण तंत्रज्ञान.

**2. दूरचित्रवाणी पत्रकारिता**: स्वरूप, विविध आशय प्रकार – बातमीपत्रे, विशेष वार्तापत्रे, चर्चात्मक कार्यक्रम, माहितीपट, थेट प्रसारण, मुलाखती.

**3. भारतीय दूरचित्रवाणी पत्रकारिता:** वृत्तवाहिन्या – राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय; वृत्तवाहिन्यांचा इतिहास, महत्वाच्या वृत्तवाहिन्यांची भूमिका व प्रभाव; मराठी वृत्तवाहिन्या – उदय, विस्तार व सद्यस्थिती.

**4. दूरचित्रवाणी वार्तांकन:** दृश्ये व अन्य तपशील यांचे संकलन, पीस- टू- कॅमेरा, टिक-टॉक; वार्तांकनाची क्षेत्रे, वार्ताहराची कौशल्ये व जबाबदाऱ्या.

**5. दूरचित्रवाणी वृत्तसंपादन:** वृत्तलेखनाची भाषा, दृश्यांसाठी लिहिणे व संकलन, टिकर्स व मथळे लेखन.

## ACJ 106 नभोवाणी व श्राव्य पत्रकारिता

**1. श्राव्य माध्यमे:** प्रकार, स्वरूप, बलस्थाने व मर्यादा, श्राव्य माध्यम तंत्रज्ञान.

**2. प्रारंभ व विकास:** भारतातील नभो वाणीचा इतिहास, विकास व सद्यकालीन परिस्थिती, प्रसारभारती आणि आकाशवाणीची संस्थात्मक रचना, प्रसारणसंबंधी नियम व कायदे इ.

**3. नभोवाणी व श्राव्य पत्रकारिता:** वृत्तपत्रकारिता आणि नभोवाणी पत्रकारिता यातील फरक, नभोवाणी माध्यमासाठीचे वृत्तसंकलन, वृतसंपादन आणि बातम्यांचे सादरीकरण; वार्ताहराच्या हक्क आणि जबाबदारी, बातमीलेखनाची शैली व वैशिष्ट्ये.

**4. नभोवाणीसाठीची आशयनिर्मिती:** कार्यक्रमांचे स्वरूप, सादरीकरण तंत्र व कौशल्ये,

**5.** खासगी एफएम वाहिन्या व त्यांच्या कार्यक्रमांचे स्वरूप, रेडिओ जॉकीची भूमिका व जबाबदारी.

**6. कम्युनिटी रेडिओ:** इतिहास आणि वैशिष्ट्ये, महाराष्ट्रातील कम्युनिटी रेडिओ केंद्रे, कम्युनिटी रेडिओ केंद्रांचे व्यवस्थापन व आशयनिर्मिती.

**7.** **पॉडकास्ट**- स्वरुप व निर्मिती – विषय निश्चिती, ध्वनिमुद्रण, संकलन, अपलोडिंग इ.

## ACJ 107 **डिजिटल पत्रकारिता**

**उद्देशः** संगणक, इंटरनेट व त्यावर आधारित नवमाध्यमांच्या प्रसारामुळे डिजिटल विश्व मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. समाजमाध्यमांवरील संवादाचा पैसही वाढला आहे. डिजिटल विश्वातील माहितीच्या प्रसाराबरोबरच तिची खातरजमा करणे आणि विविध प्रकारचा आशय लोकांपर्यंत पोहचवणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे डिजिटल माध्यमांशी अनुषंगिक पत्रकारिता व आशयनिर्मितीच्या संधीही वाढल्या आहेत. त्यांची तोंडओळख होण्याबरोबरच डिजिटल पत्रकारितेशी संबंधित काही मूलभूत कौशल्येही विद्यार्थी या विषयाच्या अध्ययनातून आत्मसात करू शकतील.

1. **डिजिटल माध्यमांची ओळखः** संगणक,इंटरनेट व डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास, डिजिटल माध्यमांचे स्वरूप, आंतरसंवादीपणा, विविध समाजमाध्यम व्यासपीठांचे स्वरूप, बहुमाध्यमे आणि आशयवैविध्य, माध्यम समुच्चय (मीडिया कॉन्व्हर्जन्स)

2. **डिजिटल माध्यमांसाठीचे लेखन व आशयनिर्मिती:**डिजिटल आशयाची वैशिष्ट्ये, व्यासपीठानुरूप आशयाचे वेगळेपण व प्रकार, कंटेन्ट मॅनेजमेंट सिस्टीमची (सीएमएस) ओळख, दृक्श्राव्य व संवादी आशय, डिजिटल आशयाविषयीची मार्गदर्शक व नियामक तत्त्वे

3. **वृत्तसंकेतस्थळे व समाजमाध्यमांशी निगडित पत्रकारिताः** भारतातील वृत्तसंकेतस्थळांचा इतिहास, वृत्तसंकेतस्थळांचे स्वरूप, प्रकार व वैशिष्ट्ये, अपमाहितीचे आव्हान (इन्फर्मेशन डिसॉर्डर) आणि तथ्यांची पडताळणी (फॅक्टचेकिंग), पत्रकारितेसाठी डिजिटल साधनांचा वापर, समाजमाध्यमांचा माहितीस्रोत म्हणून वापर, समाजमाध्यमांवरील पत्रकारिता

4. **मोबाईल जर्नालिझमः** दूरसंचार तंत्रज्ञानाचा विकास व स्मार्टफोनची वैशिष्ट्ये, स्मार्टफोनमार्फत आशयनिर्मितीच्या शक्यता (गॅझेट्स व अँप्लिकेशन्स), स्मार्टफोनचा प्रस्थापित माध्यमांसाठीच्या पत्रकारितेसाठी वापर (उदाहरणे व प्रयोग), स्मार्टफोनमार्फत दृक्श्राव्य निर्मिती व संपादन

5. **डिजिटल माध्यमांचे अर्थकारणः** वृत्तसंकेतस्थळांचे व्यवस्थापन व अर्थकारण, कुशल मनुष्यबळाची गरज व व्यवस्थापन, डिजिटल उत्पन्नासाठीचे मार्ग व प्रारुपे (पे-वॉल्स, वर्गणी, देणग्या, जाहिराती व इतर)

## ACJ **108 चालू घडामोडी (राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्य)**

**उद्देशः** कोणत्याही माध्यमांत काम करणाऱ्या पत्रकारांना समकालीन घडामोडींची आणि सामाजिक प्रश्नांची जाण आवश्यक असते. पत्रकार सर्वज्ञ नसला, तरी विविध क्षेत्रांविषयीची थोडीफार माहिती त्याला असावी लागते. रोजच्या घटना स्वतः समजून घेऊन सर्वसामान्यांना सोप्या शब्दांत कळवण्याची जबाबदारी पत्रकारांवर असते. सभोवतालच्या अशा घडामोडींचा अभ्यास कसा करावा हे विद्यार्थी या विषयाच्या निमित्ताने होणाऱ्या चर्चा व सादरीकरणांतून शिकू शकतील. पहिल्या सत्रातील या विषयात जग व भारताच्या इतिहासाबरोबरच समकालीन प्रश्नांची ओळख पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना होऊ शकेल.

1. **जगाचा संक्षिप्त इतिहास व समकालीन जगः** मानवाची उत्क्रांती व जगाच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे, औद्योगिक क्रांती, युरोपमधील प्रबोधन व साम्राज्यवाद, फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांती, पहिले व दुसरे महायुद्धः कारणे, स्वरूप व परिणाम, शीतयुद्ध, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना, आंतरराष्ट्रीय अभ्यासाचे आदर्शवादी व वास्तववादी धोरण, राष्ट्रवाद व राष्ट्रीय हितसंबंधांची संकल्पना, भारताचे राष्ट्रीय हितसंबंध, परराष्ट्र धोरणाचे प्रमुख

टप्पे व समकालीन आव्हाने, भारत व दक्षिण आशिया, चीनचे वाढते वर्चस्व व आव्हान, शीतयुद्धोत्तर नवी जागतिक व्यवस्था, जागतिकीकरण व खुल्या आर्थिक धोरणाचे परिणाम, तापमानवाढ व हवामान बदलाच्या समस्यांना प्रतिसाद, आंतरराष्ट्रीय दहशतवाद – स्वरूप व आव्हान

2. **भारताचा संक्षिप्त इतिहास व समकालीन भारत:** भारताच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे, सिंधु-सरस्वती संस्कृती, वैदिक काळ, रामायण-महाभारत महाजनपदे, गौतम बुद्ध व महावीर, भारतातील साम्राज्ये, परकीय आक्रमणे व त्यांचा परिणाम, स्वातंत्र्यलढ्यातील विविध प्रवाह, भारतातील प्रबोधन व सामाजिक सुधारणा, भारतीय राज्यघटना, स्वातंत्र्योत्तर इतिहासातील महत्त्वाचे टप्पे, स्वातंत्र्योत्तर राजकीय व सामाजिक वाटचाल, भारतातील प्रमुख राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष, जागतिकीकरण व खुले आर्थिक धोरण, भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, भविष्यातील भारत – आकांक्षा, स्वप्ने व आव्हाने

3. **समकालीन महत्त्वाच्या घडामोडी:** अभ्यासक्रमाच्या काळातील स्थानिक, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या घटनांची चर्चा व विश्लेषण, प्रचलित काळातील सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रवाहांची चर्चा, विविध क्षेत्रांतील घडामोडींचा पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून अभ्यास

## सत्र दुसरे

### ACJ **201 मुद्रित पत्रकारिता – वार्तांकनाची क्षेत्रे व विषयविशिष्ट पत्रकारिता**

**उद्देश:** मुद्रित व इतर माध्यमांवरील पत्रकारितेत विविध क्षेत्रातील ताज्या माहितीचे संकलन करून ती सामान्य नागरिकांपर्यंत पोचवणे महत्त्वाचे असते. अशा वृत्तक्षेत्रांचे किंवा बीट्सचे महत्त्व अधोरेखित करण्याबरोबरच त्यांचा झालेला विस्तार व नव्या क्षेत्रांची त्यात पडलेली भर विद्यार्थ्यांना माहिती असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने विकास, क्रीडा, आरोग्य व जीवनशैलीविषयक पत्रकारितेची थोडक्यात माहिती या विषयात मिळेल. तसेच, संपादनातील आधुनिक प्रक्रियांची ओळखही विद्यार्थ्यांना होऊ शकेल.

1. **वृत्तसंकलनाची क्षेत्रे (न्यूजबीट्स):** समाजजीवनातील विविध क्षेत्रांचे महत्त्व आणि बातमीदारी, सर्वसाधारण बातमीदारी व विशेष क्षेत्रातील बातमीदारी, महत्त्वाची कार्यक्षेत्रे: राजकारण व प्रशासन, सांस्कृतिक, शिक्षण, गुन्हेगारी व न्यायालये, व्यापार-उद्योग व तंत्रज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान, हवामान व नैसर्गिक आपत्ती, पर्यावरण, आरोग्य, दळणवळण, सेनादले व राष्ट्रीय संरक्षण; कार्यक्षेत्रातील माहितीस्रोतांचा विकास व संवर्धन, वृत्तसंस्थांसाठी बातमीदारी, वृत्तसंकेतस्थळांसाठी बातमीदारी, डिजिटल व सोशल मीडियातील माहितीचे स्रोत आणि तिच्या वापरातील खबरदारी

2. **विषयविशिष्ट पत्रकारिता:**

2.1 **विकास पत्रकारिता:** विकास म्हणजे काय?, विकासासाठी संवाद: उद्दिष्टे व पद्धती, विकाससंवादाची प्रतिमाने, स्वातंत्र्योत्तर भारतातील विकासाचे स्वरूप व प्रश्न, विकास पत्रकारितेचे स्वरूप, विकासप्रवण बातम्यांचे लेखन.

2.2 **क्रीडा पत्रकारिता:**मानवी जीवनातील क्रीडाक्षेत्राचे महत्त्व, महत्त्वाचे क्रीडाप्रकार व त्यांची मूलभूत माहिती, क्रीडा पत्रकारितेचा इतिहास, क्रीडाविषयक बातमीदारी व लेखनाची वैशिष्ट्ये, स्थानिक क्रीडास्पर्धा ते ऑलिंपिकचे वार्तांकन: संधी व आव्हाने, क्रीडाविषयक बातम्यांचे नियोजन व संपादन, वृत्तपत्रांतील क्रीडाविषयक पाने, पुरवण्या, नियतकालिके आणि क्रीडा संकेतस्थळांचा अभ्यास

2.3 **आरोग्य व जीवनशैलीविषयक पत्रकारिता:**आधुनिक जीवनातील आरोग्य व जीवनशैलीचे महत्त्व, सार्वजनिक आरोग्यधोरण व आरोग्यसुविधा, साथीचे रोग आणि त्याविषयीची उपाययोजना, आरोग्य संवादाचे

महत्त्व आणि प्रक्रिया, बदलती जीवनशैली व त्यातून निर्माण झालेले प्रश्न, नागरी भागात विविध समुदायांची संमिश्र वस्ती, परंपरा आणि आधुनिकता, बदलती कुटुंबव्यवस्था व नागरी जीवन, महानगरे आणि उपनगरांमधील जीवन

3. **बहुमाध्यम युगातील संपादन**: माध्यमांचे बदलते स्वरूप, आशयाचे माध्यमविशिष्ट आकृतिबंध, आशयाचे बहुमाध्यमांतील सादरीकरण व त्यासाठीचे संपादन, बहुमाध्यमांतील आशयाची निवड व संवर्धन (क्युरेशन)

## ACJ **202 जाहिरात**

**उद्देश**: मुख्य माध्यमांमधील पत्रकारितेबरोबरच जाहिरात व जनसंपर्क ही विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर व्यवसाय व रोजगाराच्या संधी देणारी क्षेत्रे आहेत. विविध उत्पादने, उद्योग आणि सेवापुरवठादार संस्थांच्या आकर्षक जाहिराती व त्यासाठीचे लेखन हा सर्जनशील आशयनिर्मितीचा भाग आहे. माध्यमांना व्यावसायिक स्थिरतेसाठी जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न आवश्यक असते. तसेच, जाहिरातींनाही ग्राहकांपर्यंत पोचण्यासाठी माध्यमांची मदत गरजेची असते. या दोन्हींचे परस्परपूरक संबंध लक्षात घेऊन जाहिरात क्षेत्राची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे महत्त्वाचे आहे. तसेच, जाहिरातींचे लेखन, त्यासाठीची आशयनिर्मिती, त्यातील सर्जनशील प्रक्रिया, ब्रँडची घडण आदी पैलूंची अधिक माहिती विद्यार्थी या विषयातून मिळवू शकतील.

1. **जाहिरात क्षेत्राची ओळख**: जाहिरातींचा संक्षिप्त इतिहास; भारतातील जाहिरातविश्व; जाहिरातीचा अर्थ, स्वरूप आणि संकल्पना, जाहिरातीची आवश्यकता व मूळ घटक, प्रसिद्धी आणि प्रचार यांतील फरक, जाहिरातींबद्दलचे संज्ञापनकेंद्री आणि विक्रयकेंद्री दृष्टिकोन.

2. **जाहिरातीची प्रक्रिया**: जाहिरातीची पारंपरिक माध्यमे, माध्यमसंस्थांमधील जाहिरात विभाग, जाहिरात संस्थेची रचना, बाजारपेठ संशोधन, माध्यमनियोजन, जाहिरातीची मांडणी व त्यासाठी संहितालेखन (कॉपी रायटिंग), आचारसंहिता, ब्रँडओळख: व्यक्ती-संस्था-निर्मित वस्तू व सेवांची प्रतिमानिर्मिती, ब्रँडव्हॅल्यू; जाहिरातींची गरज; विशिष्ट मोहिमांची उद्दिष्टे; जाहिरातदार एजन्सी, माध्यम व ग्राहक संबंध; जाहिरात एजन्सीची भूमिका व त्यातील विविध विभागांची कार्ये: विशिष्ट खाते, सर्जनशील आशयनिर्मिती, संशोधन, माध्यम नियोजन इ., जाहिरात एजन्सीचे अर्थकारण

3. **जाहिरातींची निर्मिती**: सर्जनशील प्रक्रिया. लक्षित उपभोक्ता, जनसांख्यिकीय आणि मनोवैज्ञानिक विश्लेषण; ब्रँड, उत्पादन आणि प्रतिस्पर्धी ब्रँडचे विश्लेषण; संशोधन निविष्ठांचा वापर; सर्जनशील संक्षिप्तवर पोहोचणे: संदेश आणि सर्जनशील रणनीती; जाहिरातीत वापरली जाणारी वेगवेगळी आव्हाने; जाहिरातींचे प्रकार; जनजागृतीसाठी जाहिराती, व्हिज्युअलायझेशन, आर्ट वर्क, कॉपी रायटिंग.

4. **जाहिरात व माध्यमे**: जनमाध्यम, विशिष्ट माध्यम, आउट-ऑफ-होम माध्यम, जाहिरातीची नवी माध्यमे व त्यांचे स्वरूप, दृक्-श्राव्य व डिजिटल माध्यमांतील जाहिराती, प्रत्येक माध्यमाचे फायदे आणि तोटे; डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या संधी व आव्हाने; माध्यम नियोजन व रणनीती; माध्यम मिश्रणाद्वारे जास्तीत जास्त पोहोच आणि प्रभाव मिळविणे; प्रभावी माध्यम नियोजनासाठी प्रेक्षकांच्या व्यक्तिगत माहितीचा (डेटाचा) वापर, विखंडित व चंचल ग्राहक, खुल्या व छुप्या जाहिराती, जागतिकीकरण आणि वाढती स्पर्धा, प्रमुख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जाहिरात संस्था,

5. **जाहिरात आणि समाज**: जाहिरातदार, प्रसारमाध्यमे, सरकार आणि ग्राहकांसाठी जाहिरातींची भूमिका आणि महत्त्व, जाहिरातींचा समाज व संस्कृतीवर होणारा परिणाम; जाहिरातींची सामाजिक जबाबदारी;

एएससीआयची भूमिका; भारतातील नियम आणि कायदे; जाहिरातींबद्दल लोकांचा समज; विविध दृष्टिकोनातून जाहिरातींचे टीकात्मक विश्लेषण.

**अंतर्गत मूल्यमापन:** वेगवेगळ्या उद्योगांच्या एकाच उत्पादनाचे / सेवेचे तुलनात्मक विश्लेषण; काल्पनिक ब्रँड विकसित करणे आणि जाहिरात मोहीम तयार करणे; जाहिरात एजन्सींना भेटी आणि जाहिरात व्यावसायिकांशी संवाद; लोकसेवेच्या जाहिराती तयार करणे इ.

## ACJ **203 जनसंपर्क व कॉर्पोरेट संज्ञापन**

**उद्देश:** जाहिरातींबरोबरच व्यक्ती व संस्थांची प्रतिमानिर्मिती व ब्रँडिंगसाठी माध्यमांच्या कार्याची माहिती असणाऱ्या कुशल जनसंपर्क अधिकाऱ्यांना मोठी मागणी आहे. खासगी क्षेत्राच्या विस्तारामुळे कॉर्पोरेट कंपन्यांना सर्वसामान्य नागरिक व धोरणकर्त्यांशी प्रभावी संवाद राखणे अत्यावश्यक झाले आहे. राजकीय क्षेत्रातही आता माध्यमे व जनसंपर्काची जबाबदारी सांभाळणारे सल्लागार व कुशल मनुष्यबळ कळीचे ठरत आहे. त्या दृष्टिने या क्षेत्रांची तोंडओळख होण्याबरोबरच त्यासाठी आवश्यक कौशल्यांची माहितीही विद्यार्थ्यांना या विषयाच्या अध्ययनातून मिळू शकेल.

1. **जनसंपर्क – संकल्पना व भूमिका:** जनसंपर्काची व्याख्या, उद्देश आणि उपयुक्तता, जाहिरात आणि जनसंपर्कातील फरक, व्यक्ती, संस्था व उद्योगांचे प्रतिमासंवर्धन, अंतर्गत व बाह्य जन (पब्लिक), जनसंपर्क विभागाचे कार्य व जबाबदारी, जनसंपर्क अधिकाऱ्याची गुणवैशिष्ट्ये, जनसंपर्काची पारंपरिक साधने, पत्रकार परिषदांचे आयोजन व प्रसिद्धीपत्रके, संकटकाळातील जनसंपर्क
2. **जनसंपर्क क्षेत्रातील संधी व आव्हाने:** विविध क्षेत्रांत जनसंपर्काची गरज (राजकीय नेते व पक्ष, स्वयंसेवी संस्था, इत्यादी), जनसंपर्कासाठी नव्या माध्यमांचा वापर, सार्वजनिक कार्यक्रमांचे संयोजन, स्थानिक ते जागतिक पातळीवर संधींची उपलब्धता
3. **कॉर्पोरेट संज्ञापन:** आधुनिक कार्पोरेट क्षेत्राचे स्वरूप व जनसंपर्काची आवश्यकता, कंपनींतर्गत संज्ञापनाची रचना, गृहपत्रिका, उद्योग-व्यवसायांचे प्रतिमासंवर्धन (ब्रँडिंग), समाजमाध्यमांचा कॉर्पोरेट संस्थांच्या प्रतिमानिर्मिती व जनसंपर्कासाठी वापर, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (सीएसआर) आणि त्याअंतर्गत कामाची प्रसिद्धी, कॉर्पोरेट संवादाचे गुणात्मक मूल्यमापन
4. **राजकीय क्षेत्रातील जनसंपर्क व माध्यम व्यवस्थापन:** राजकीय क्षेत्राचे माध्यमीकरण, राजकीय नेते व पक्षांची प्रतिमानिर्मिती आणि त्यासाठी माध्यमव्यवस्थापन, समाजमाध्यमांचा वाढता वापर व त्याच्या नियोजनाची गरज, निवडणुकांच्या काळातील प्रचारमोहिमांची आखणी व कार्यवाही, उमेदवारांच्या समाजमाध्यम प्रसिद्धीचे नियोजन व हाताळणी, ट्रोल्स व नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना, विधायक व प्रभावी प्रतिमानिर्मितीचे आव्हान

## ACJ **204 माध्यमे व समाज**

**उद्देश:** माध्यमे आणि समाजाचे नाते परस्परावलंबी आहे. ते समजून घेण्याबरोबरच बदलत्या तंत्रज्ञानाचे माध्यमे आणि समाजावर होणारे परिणामही समजून घ्यावे लागतात. या दृष्टीने संवादशास्त्राच्या दृष्टीने माध्यमांचे बदलते स्वरूप व व्यक्ती-समुदाय-समाजावरील त्याचे विविधांगी परिणाम अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. माध्यमांमध्ये काम करू

इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच नागरिक म्हणूनही माध्यमवापराविषयीची सजगता येण्यासाठी हा विषय उपयुक्त ठरू शकेल.

1. **संवादशास्त्राची ओळख व माध्यमांचा विकासः**मानवी जीवनातील संवादाचे स्थान, संवादप्रक्रियेचे मूलभूत घटक व प्रकार, भाषा हे एक माध्यम, संवादातील गाळण्या व अडथळे, जनसंवादाचे स्वरूप व वैशिष्ट्ये, जनमाध्यमांचा विकास, आधुनिक संवादशास्त्राचा उदय व विकास, संवादशास्त्रातील निवडक प्रतिमाने (अरिस्टॉटल, लॅसवेल, ऑसगुड अँड श्रॅम, इत्यादी)

2. **माध्यमांचे समाजातील स्थानः** मार्शल मॅकलुहानचे माध्यमविषयक विचार– माध्यम हाच संदेश, भाषा व समाज, माध्यमांचा विकास व समाज, माध्यमांची कार्ये व अपकार्ये (लॅसवेल), माध्यमे आणि प्रचारतंत्र, माध्यमे आणि लोकशाही, नेटवर्क सोसायटी व डिजिटल समाज-संस्कृती

3. **माध्यमांच्या परिणामांविषयीचे सिद्धांतः** व्यक्ती, समुदाय, संस्था व समाजावर होणारे माध्यमांचे परिणाम, माध्यमांच्या परिणामांविषयीचे विविध सिद्धांत व दृष्टिकोन

4. **माध्यम साक्षरताः** माध्यम साक्षरता म्हणजे काय?, माध्यम साक्षरतेची आवश्यकता, माध्यमांचा व्यक्तिगत उपयोग, माध्यमसवयी व त्यांचे माध्यमव्यसनात रुपांतर होण्याची शक्यता, माध्यमांच्या विधायक व प्रभावी उपयोगाच्या शक्यता

## ACJ 2**05 माध्यम-व्यवस्थापन व कायदे**

**उद्देशः** विविध माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांना पत्रकारितेच्या नीतिमूल्यांबरोबरच माध्यमसंस्थांचे व्यवस्थापन कसे केले जाते, हे माहिती असणे अत्यावश्यक आहे. तसेच, विविध घडामोडींचे वार्तांकन करत असताना त्यासंबंधीच्या नैतिक व कायदेशीर मर्यादांचे भानही त्यांना असणे आवश्यक आहे. या विषयाच्या अध्ययनातून व्यवस्थापन व माध्यमविषयक कायद्यांची योग्य जाण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकेल.

1. **माध्यमांचे व्यवस्थापनः** माध्यमे हा एक व्यवसाय, माध्यमसंस्थांचे प्रकार व व्यवस्थापकीय संरचना, संपादकीय विभाग आणि व्यवस्थापन, माध्यमांचे अर्थकारण व राजकीय अर्थशास्त्र, मालकीहक्क आणि गुंतवणुकीचे स्वरूप, समाज आणि सरकारशी नाते – निर्बंध व नियमन

2. **पत्रकारितेची नीतिमूल्ये व मूलतत्त्वेः** पत्रकारितेची मूलभूत तत्त्वे – सत्य, वस्तुनिष्ठता आणि समतोल, तथ्यांची पडताळणी व माहितीचा प्रसार, पत्रकारितेचे लोकशाही समाजातील स्थान, पत्रकारांची सामाजिक जबाबदारी, पत्रकारांवरील अंतर्गत व बाह्य दबाव, भेटवस्तू आणि इतर प्रलोभने,

3. **माध्यमविषयक कायदेः**राज्यघटना आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य, वृत्तपत्रांची नोंदणी, श्रमिक पत्रकार कायदा, मुद्रणाधिकार, राष्ट्रीय सुरक्षा आणि गोपनीयतेचा कायदा,अब्रुनुकसानी व बदनामी, अश्लीलता, कायदा-सुव्यवस्था आणि दंगलींचे वार्तांकन,मुले व महिलांवरील अत्याचारांचे वार्तांकन, विधिमंडळाचे विशेषाधिकार व कामकाजाचे वार्तांकन, न्यायालयाची बेअदबी, नियंत्रण की स्वनियमन, माध्यमांची आचारसंहिता, भारतीय वृत्तपत्रमंडळाची (प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया) रचना व अधिकार, चित्रपटविषयक निर्बंध (सेन्सॉरशिप) व संबंधित कायदे, दूरचित्रवाणीविषयक नियम व कायदे, प्रसारभारती कायदा, इंटरनेट आणि नवमाध्यमांच्या नियमनासंबंधी विविध कायदे

4. **माहिती अधिकाराचा कायदा व त्याचा उपयोगः** कायद्यातील ठळक तरतुदी, पत्रकारितेसाठी माहिती अधिकाराचा वापर – विविध उदाहरणे, माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे हक्क व त्यांचे संरक्षण

ACJ 206 **चालू घडामोडी (समकालीन राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्य)**

**उद्देशः** मराठी माध्यमातून पत्रकारिता शिकणारे विद्यार्थी प्रामुख्याने महाराष्ट्रातील प्रमुख माध्यमसंस्थांमध्ये किंवा त्यांच्या दिल्ली वा परराज्यांतील आवृत्त्यांमध्ये काम करण्याची शक्यता सर्वाधिक आहे. त्यांना समकालीन जग व भारतातील प्रश्नांबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास व त्यातील समकालीन प्रवाहांची माहिती असणे आवश्यक आहे. त्या दृष्टिने दुसऱ्या सत्रात या विषयाचा समावेश केला आहे. त्यातून समकालीन प्रश्नांमधील ऐतिहासिक पेचांचा उलगडा करण्यास त्यांना मदत होईल.

1. **महाराष्ट्राची जडणघडणः** महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे, महाराष्ट्रातील प्रमुख राजघराणीः सातवाहन ते देवगिरीचे यादव, मराठी भाषेच्या विकासाचे टप्पे व त्यातील वैशिष्ट्ये
2. **हिंदवी स्वराज्य ते मराठा मंडळः** अल्लाउद्दीन खिलजीचे आक्रमण व यादव साम्राज्याची अखेर, बहामनी राजवटीचे स्वरूप, छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्य, मुघली आक्रणाचा प्रतिकार आणि स्वराज्याचा विस्तार, मराठा मंडळाचे स्वरूप व प्रभाव, मराठी राज्याची अखेर व त्याची कारणमीमांसा
3. **स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्रः** महाराष्ट्रातील प्रबोधन व सामाजिक सुधारणांचा इतिहास, ब्रिटिशांविरोधातील उठाव व क्रांतिकारकांचे योगदान, राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान व त्यातील विविध प्रवाह
4. **समकालीन महाराष्ट्रः** भाषावार राज्ये, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व महाराष्ट्र राज्याची निर्मिती, महाराष्ट्राचा भूगोल व प्रादेशिक वैशिष्ट्ये, सहकार चळवळीचे स्वरूप व सद्यस्थिती, महाराष्ट्रातील शेती, उद्योग व अर्थकारण, महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरूप व त्यातील पेच, महाराष्ट्रातील राजकारण व त्याचे बदलते स्वरूप, महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष, त्यांचे नेतृत्व व सामाजिक आधार.
5. **समकालीन महत्त्वाच्या घडामोडीः** अभ्यासक्रमाच्या काळातील स्थानिक, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या घटनांची चर्चा व विश्लेषण, प्रचलित काळातील सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रवाहांची चर्चा, विविध क्षेत्रांतील घडामोडींचा पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून अभ्यास

ACJ **207 कार्यानुभव आणि अभ्यासभेटी** (श्रेयांक ४, एकूण गुण १००, अंतर्गत गुण ७५, व्हायवा २५ गुण)

**उद्देशः** पत्रकारितेच्या शिक्षणात प्रात्यक्षिके आणि माध्यमांमधील अनुभवाला महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरचित्रवाणी व डिजिटल माध्यमांचे काम प्रत्यक्ष कसे चालते हे विद्यार्थ्यांना तिथे कार्यानुभवादरम्यान शिकता येतील आणि माध्यमांसाठीची मूलभूत कौशल्ये निरीक्षणातून आत्मसात करता येतील. तसेच, विविध माध्यमसंस्था, ऐतिहासिक स्थळे, संग्रहालये, विज्ञान-तंत्रज्ञान प्रयोगशाळा, सामाजिक संस्था आदींना प्रत्यक्ष भेटी देणे, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या मुलाखती घेणे आदी उपक्रमांमधूनही विद्यार्थ्यांची चांगली जडणघडण होऊ शकेल. त्यासाठीचे नियोजन या विषयांतर्गत करता येईल.

**कार्यानुभवः** प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासक्रम संपण्यापूर्वी एखादे वृत्तपत्र वा त्याच्या पसंतीच्या माध्यमात किमान शंभर तास (रोज पाच तास याप्रमाणे एकूण २० दिवस) प्रशिक्षणार्थी पत्रकार म्हणून काम करणे अपेक्षित आहे. कार्यानुभवाचे मूल्यमापन करताना संबंधित माध्यमसंस्थेतील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याला दिलेली श्रेणी, विद्यार्थ्याने सादर केलेला अहवाल, कामातील नियमितता व केलेले काम यांचा विचार केला जाईल. (५० गुण)

**अभ्यासभेटी व सहलीः** विद्यार्थ्यांनी पुणे शहर व परिसरातील महत्त्वाच्या माध्यमसंस्था, ऐतिहासिक स्थळे, संग्रहालये, विज्ञान-तंत्रज्ञान प्रयोगशाळा, सामाजिक संस्था आदींना प्रत्यक्ष भेटी द्याव्यात. विद्यार्थी व्यक्तिगतरीत्या

अशा स्थळांना भेटी देऊ शकतील किंवा विभागाच्या वतीनेही अशा भेटींचे आयोजन करता येऊ शकेल. अशा भेटींवर आधारित लेखी अहवाल विद्यार्थ्यांनी सादर करणे अपेक्षित आहेत. तसेच, अभ्यासक्रमादरम्यान विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या मुलाखती विद्यार्थी घेऊ शकतील. अशा तज्ज्ञांची विशेष व्याख्यानेही विभागात आयोजित करता येतील. अशा मुलाखती व व्याख्यानांचे लेखी अहवाल विद्यार्थ्यांनी सादर करणे अपेक्षित आहे. (२५ गुण)

**बाह्य मूल्यमापनः** विद्यार्थ्यांनी कार्यानुभव व अभ्यासभेटींवर आधारित लेखी अहवालांची स्वतंत्र फाइल (धारिणी) तयार करणे अपेक्षित आहे. बाह्य परीक्षक तोंडी परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील. त्यावर आधारित एकूण २५ गुणांचे मूल्यमापन ते विभागात सादर करतील.

## ACJ **208** **व्यक्तिगत प्रकल्प**

**उद्देशः** व्यक्तिगत व गटाच्या पातळीवरील प्रकल्प, संस्थाभेटी, आदींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक कसदार होऊ शकेल.

**व्यक्तिगत प्रकल्पः** (श्रेयांक ४, एकूण गुण १००)

१. प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या आवडीचा विषय निवडून त्यासंबंधी विविध माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचे संकलन करावे, त्यांचा अभ्यास करावा आणि या विषयावर सुमारे ४००० ते ५००० शब्दांचा विस्तृत लेख लिहावा.

**किंवा**

२. विद्यार्थी सामाजिक संशोधनावर आधारित प्रकल्प किंवा सखोल वार्तांकन अहवाल (एखाद्या विषयाच्या किमान तीन पैलूंचा अभ्यास करून रिपोर्ताज शैलीतील तीन लेख) सादर करू शकतील. प्रत्येक लेख १५०० ते २००० शब्दांचा असावा.

विभागातील मार्गदर्शक शिक्षक अंतिम अहवालाचे ३० गुणांसाठी, तर तोंडी परीक्षेच्या आधारे २० गुणांसाठी अंतर्गत मूल्यमापन करतील.

**बाह्य मूल्यमापनः** बाह्य परीक्षक अंतिम अहवालाचे ३० गुणांसाठी, तर तोंडी परीक्षेच्या आधारे २० गुणांसाठी बाह्य मूल्यमापन करतील.

-----------------------------------------